महात्मा फुले कृषि विद्यापीठ

अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

# ई वार्ता

## ऑगस्ट २०२२




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४८३/२०२२

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात देशाचा अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन उत्साहात संपन्न







**दि. १५ ऑगस्ट, २०२२.** आज आपण सर्व देशाच्या स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करत आहोत. यावेळी आपल्या देशाला स्वातंत्र्य देण्यासाठी ज्यांनी बलिदान केले असे शूर जवान, थोर क्रांतिकारक यांना नमन केले पाहिजे असे आवाहन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. ते पुढे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने या अमृत महोत्सवी वर्षांमध्ये संशोधनाबरोबरच शिक्षण व विस्तारामध्ये उल्लेखनीय असे काम केले आहे. विद्यापीठाच्या कसबे डिग्रज येथील संशोधन केंद्रात तयार झालेल्या सोयाबीनच्या विविध वाणांचे क्षेत्र देशातील ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर पसरले आहे. विद्यापीठाच्या कांदा बियाण्यांची शेतकऱ्यांमध्ये असलेली मागणी लक्षात घेऊन विद्यापीठाने दहा टनांपर्यंत कांदा बियाण्याचे उत्पादन घेतले. त्याचबरोबर राज्यातील पंधराशेपेक्षा जास्त शेतकरी उत्पादक कंपन्यांना ब्रिडर बियाणे देऊन त्यानंतर तयार होणाऱ्या सर्टिफाइड बियाण्यामुळे लाखो शेतकऱ्यांना त्याचा फायदा झालेला आहे. डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाला ए.आय.सी.टी.ई. ची अधिस्वीकृती मिळाली आहे. कानपूर येथील आय.आय.टी. सोबत नमामि गंगे प्रकल्पासाठी सामंजस्य करार करणारे हे पहिले कृषि विद्यापीठ आहे. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके, विशेष कार्य अधिकारी डॉ. महानंद माने, मुख्य शास्त्रज्ञ बियाणे डॉ. आनंद सोळंके, उपकुलसचिव श्री. विजय पाटील, सर्व विभाग प्रमुख, सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे उपस्थित

होते. यावेळी एनसीसी अधिकारी डॉ. सुनील फुलसावंगे यांनी परेडचे संचलन केले. सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी पदयुत्तर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये विद्यार्थी तसेच प्राध्यापक व कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीमध्ये देशी गाई भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा सुवर्ण क्षण



**दि. ५ ऑगस्ट, २०२२.** देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्र अंतर्गत भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर करून महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे पहिल्यांदाच गीर जातीच्या कालवडीचा जन्म झाला आहे. सदर प्रकल्प पशुसंवर्धन दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे येथे कार्यरत असून माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते २८ ऑक्टोबर, २०२१ मध्ये या प्रगत तंत्रज्ञान वापराचा शुभारंभ करण्यात आला होता. सदर तंत्रज्ञानाच्या वापराने पहिल्याच गीर जातीच्या कालवडीचा जन्म संकरित गायीच्या माध्यमातून गो संशोधन व विकास प्रकल्प, राहुरी येथे झाला.कालवडीचे वजन २२.९ किलो असून पिता विष्णू या वळूमातेचे दूध ४१६५ ली. आहे व फॅट ५ % एवढे आहे अशी माहिती भ्रूण प्रत्यारोपण समन्वयक डॉ. विष्णू नरवडे यांनी दिली. महाराष्ट्र शासनाने देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर व शेतकऱ्यांच्या गोठयात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सुरुवात केली आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे १५० पेक्षा जास्त साहिवाल, गीर, राठी, थारपारकर व लाल सिंधी जातीच्या वासरांचा जन्म होणार आहे अशी माहिती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी दिली. सदर तंत्रज्ञान एनडीडीबी, राहुरी यांच्या मार्फत राबविण्यात येत असून उच्च वंशावळीचा देशी गोवंश व त्यांची संख्या वाढवण्यासाठी, संवर्धनासाठी खूप मोठी मदत होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या तंत्रज्ञानाबद्दल सांगताना म्हणाले की सध्या देशातील शुद्ध देशी गोवंशाची असलेली घटती संख्या पाहता जलदगतीने उच्च उत्पादन क्षमता असणाऱ्या गाईंची संख्या वाढवण्यासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाशिवाय तरणोपाय नाही असे सांगितले व सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, विभाग

प्रमुख डॉ. कांबळे यांनी अभिनंदन करून समाधान व्यक्त केले. सदर प्रकल्प यशस्वी होण्यासाठी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने, डॉ. धीरज कणखरे, डॉ. विष्णू नरवडे, डॉ. प्रमोद साखरे, डॉ. सुनिल अडांगळे तसेच एनडीडीबीचे डॉ. शिवकुमार पाटील हे काम करत आहेत.

## श्री. सचिन शेलार व श्री. हेमंत कळमकर हे आहेत ऑगस्ट महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो. तसेच या व्यक्तिंचा आदर्श घेऊन तरुण शेतकरी व पदवीधरांना प्रेरणा मिळते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रत्येक महिन्याला प्रदर्शीत करण्यात येतात.

ऑगस्ट २०२२ या महिन्याकरीता शेतकरी आयडॉल म्हणुन मु.पो. म्हसवे, ता.जि. सातारा येथील श्री. सचिन

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

शेलार व कृषि उद्योजक म्हणुन कोल्हापूर कृषि महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषि) चे शिक्षण घेतलेले पुणे येथील श्री. हेमंत कळमकर यांचा समावेश आहे. श्री. सचिन शेलार हे जरबेरा, निशिगंध, डच गुलाब, ग्लॅडीएटर, सुगंधी पाकळीसाठीचा गुलाब इ. फुलांची हायटेक शेती करीत आहेत. त्यांनी म्हसवे ॲग्रीव्हिजन शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून गुलाब प्रक्रिया करुन गुलकंद, गुलाबजल, गुलाब सिरफ आणि गुलाब पाकळी तसेच उकडलेल्या भुईमुगाच्या शेंगा, पापडाचे १३ प्रकार इ. तयार करुन कंपनीच्या माध्यमातून ॲग्री मधुर नावाचा ब्रँड विकसीत केला आहे. कृषि उद्योजक असलेले श्री. हेमंत कळमकर यांनी ॲगझॉन ग्रुपच्या माध्यमातून ४०० पेक्षा जास्त व्यवसाय भागिदारांच्या मजबुत नेटवर्कमुळे दर्जेदार प्रॉडक्टस् जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले आहेत. तसेच त्यांच्या ॲगझॉन ॲग्रीटेक या कंपनीच्या माध्यमातून पुरवठा साखळीचे प्रश्न प्रामुख्याने सोडविले जातात. यामुळे पुरवठा साखळीमधील असंख्य मध्यस्त टाळले जावून ग्राहकांना योग्य किमतीला ताजी फळे आणि भाज्या उपलब्ध होतात.

## अभिनंदन

### पुणे कृषि महाविद्यालयास हरीत व स्वच्छ परीसर पुरस्कार



**दि. ११ ऑगस्ट, २०२२.** आयडीयल फौंडेशन, नवी मुंबई यांनी पुणे येथील कृषी महाविद्यालयास सन २०२२ करीताचा हरीत व स्वच्छ परीसर पुरस्कार प्रदान केला. सकल शेतकरी समाजाची ज्ञानमाता म्हणून लाखो कृषि पदवीधारांच्या हृदयसिंहासनावर विराजमान असणाऱ्या आणि शतकोत्तर रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करणा–या पुणे येथील कृषी महाविद्यालयाचा परीसर अतिशय देखणा, सुंदर, स्वच्छ व देशाला अभिमान वाटावा असा आहे. पुणे कृषि महाविद्यालयाने सध्याच्या वैश्विक तापमानवाढीच्या परिस्थितीत देखील जुन्या पुरातन वृक्षांचे संवर्धन, नवीन जागेवर शास्त्रीय पद्धतीने वृक्ष लागवड, जल पुनर्भरण, सौर उर्जा, बायोगॅसचा वापर, दाट झाडी असलेल्या क्षेत्रांचे संरक्षण अशा नानाविध उपक्रमांमधून महाविद्यालयाचा परीसर हरीत व स्वच्छ केला आहे, जोपासला आहे. महाविद्यालयाच्या या योगदानामुळे महाविद्यालयास हा पुरस्कार देण्यात आला. महाविद्यालयाचे वतीने महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व महाविद्यालयाच्या हरीत व स्वच्छ परीसर सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. सुनील मासळकर, समितीचे सदस्य सचिव डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके व सदस्य श्री. नालकर यांनी पुरस्कार स्विकारला. संगमनेर, जि. अहमदनगर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

श्री. शेखर गायकवाड, साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य हे होते तर मा.आ. डॉ. सुधीर तांबे, विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, पद्मश्री सौ. राहीबाई पोपेरे, बिजमाता, डॉ. एस. डी. सावंत, कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर, श्री. मनोज पाटील, जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर, डॉ. रामहरी सोमकुंवर, संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे, श्री. पंजाबराव डख, हवामान अभ्यासक, ममता सिंधूताई सपकाळ, समाजसेविका व श्री. विवेक कासार, माजी नगराध्यक्ष, नगरपरिषद, संगमनेर हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आयडीयल फौंडेशन, नवी मुंबई यांच्या वतीने शेतीमध्ये चांगले व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या राज्यभरातील चाळीसपेक्षा अधिक शेतकऱ्यांना आयडियल फार्मर २०२२ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## कृषि विद्यापीठाच्या प्रयोगशाळेस राष्ट्रीय मानांकन



**दि. २ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वित कीडनाशक अंश पृथःकरण योजनेतंर्गत कीडनाशक अंश पृथःकरण प्रयोगशाळेस भारतीय गुणवत्ता परिषद, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली अधिनस्त असलेल्या एन.ए.बी.एल. या संस्थेकडून ४७ कीटकनाशकांच्या अंश तपासणीसाठी आयएसओ/आयईसीः १७०२५–२०१७ या मानकाच्या अनुषंगाने मानांकन प्राप्त झाले आहे. गेल्या १६ वर्षापासून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय स्तरावरील कीडनाशक अंश विश्लेषन प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या जिल्ह्यातून फळे, भाजीपाला व कडधान्य पिकांचे नमुने गोळा करुन त्यामधील कीडनाशक अंश पृथःकरण केले जाते. एनएबीएल मानांकनामुळे प्रयोगशाळेतील तपासणी अहवालाची निष्कर्ष राष्ट्रीय तसेच जागतीक पातळीवर मान्य असणार आहेत. मानांकनाच्या गुणवत्ता व तांत्रिक विषयक बाबींची पुर्तता करण्यासाठी कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. चिदानंद पाटील, डॉ. भाईदास देवरे, डॉ. योगेश सैंदाने, विलास गिऱ्हे, दत्तात्रय औताडे व सर्व वरिष्ठ संशोधन सहयोगी यांनी परिश्रम घेतले. प्रयोगशाळेस मानांकन प्राप्त झाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी अभिनंदन केले.

वर्ष :२, अंक क्र. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## पुणे कृषि महाविद्यालय व मिटकॉन यांच्यामध्ये सामंजस्य करार



**दि. २६ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि महाविद्यालय, पुणे व मिटकॉन कन्स्लटंसी ॲन्ड इंजिनीअरींग सर्व्हीसेस प्रा. लि., पुणे या दोन संस्थांमध्ये पुणे येथे शाश्वत प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करणेसाठी सामंजस्य करार करण्यात आला. जमिनीतील सेंद्रिय कर्ब स्थिरीकरण माती, पाणी आणि हवेतील प्रदुषण कृषिजन्य व घनकचरा व्यवस्थापन या क्षेत्रातील संशोधन व विकासकार्यातील सहकार्यासाठी सामंजस्य करारावर कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या उपस्थितीत विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ व मिटकॉन कन्स्लटंसी ॲन्ड इंजिनीअरींग सर्व्हीसेस प्रा. लि. चे कार्यकारी संचालक श्री आनंद चलवादे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर, हरीत व स्वच्छ कृषि महाविद्यालय समितीचे सदस्य सचिव डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके, मिटकॉनचे व्हाईस प्रेसिडेंट डॉ. संदिप जाधव, मिटकॉनचे एक्झीक्युटीव्ह व्हाईस प्रेसिडेंट श्री. श्रीकांत काकडे, डॉ. पंकज रवंदळ, डॉ. अभय पाटील उपस्थित होते. आगामी काळात शहरी विभागातील घनकचरा व्यवस्थापन, शेत जमिनीतील काडी कचरा व्यवस्थापन, जमिनीतील व हवा प्रदुषण विषयक समस्या सोडविण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेवून तंत्रज्ञान निर्मितीसाठी परस्पर सहकार्यासाठी हा करार करण्यात आला. या करारामुळे हरीत व स्वच्छ पुणे कृषि महाविद्यालय परीसर या प्रकल्पास खूप मोठा फायदा होणार आहे.

## कार्यकारी परिषद सदस्य श्री. दत्तात्रय उगले यांची सोलापूर व पंढरपूर येथील कृषि संशोधन केंद्रांना भेटी

**दि. १ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या सोलापूर येथील राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, कृषि तंत्र विद्यालय व पंढरपूर येथील कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रास विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य श्री. दत्तात्रय उगले यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी संशोधन केंद्रावरील चालू खरीप हंगामातील बहुस्थलीय चाचणी प्रयोग व पीक प्रात्यक्षिकांची माहिती जाणून घेतली व बीजोत्पादन पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी संशोधन केंद्र परिसरातील डाळिंब, द्राक्ष, आवळा व सिताफळ इ. फळबागांच्या मार्गदर्शनासाठी व भरीव संशोधनासाठी तसेच संशोधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी विद्यापीठ स्तरावरुन मदत करण्याची हमी दिली. यावेळी राजश्री छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय कोल्हापूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तमराव होले यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. पंढरपूर कृषि



संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. रमेश भदाणे यांनी संशोधन विषयक कामांची माहिती दिली. यावेळी सोलापूरच्या विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय अमृतसागर, कोल्हापूर महाविद्यालयाचे मृदा शास्त्रज्ञ डॉ. गंगाधर पाटील, सोलापूर येथील कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत जाधव व संशोधन केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी कृषि विज्ञान केंद्र, मोहोळला भेट दिली.

## कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांची पाडेगाव ऊस संशोधन केंद्रास भेट



**दि. २५ ऑगस्ट, २०२२.** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांनी पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रास भेट दिली. भेटीच्या वेळी ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर यांनी त्यांचे स्वागत केले. ऊस विशेषज्ञ यांनी ऊस संशोधन केंद्राने शिफारस केलेल्या नवीन ऊसाच्या वाणांची आणि अधिक ऊस उत्पादन वाढविण्याचे तंत्रज्ञान सादर केले. संशोधन केंद्राने शिफारस केलेल्या वाणांचे संशोधन केंद्राचे देशासाठी आणि राज्यासाठी असलेले योगदान विषद केले. या केंद्राला देशपातळीवरील सर्वोत्कृष्ठ ऊस संशोधन केंद्र पुरस्कार आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे उत्कृष्ट संशोधन केंद्र २०२२ पुरस्कार मिळाल्याबद्दल ऊस विशेषज्ञ आणि सर्व शास्त्रज्ञांचे त्यांनी अभिनंदन केले. ऊस पिकाचे तंत्रज्ञानाविषयी कृषिविद्यावेत्ता डॉ. राजेंद्र भिलारे, मृदशास्त्रज्ञ, डॉ. सुभाष घोडके, किड व रोग शास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे, ऊस शरीरक्रियाशास्त्रज्ञ डॉ. दिपक डामसे यांचे बरोबर संवाद साधला. या भेटीच्या वेळी ऊस संशोधन केंद्रावर घेण्यात आलेल्या प्रयोगांना, नवीन वाणांचे प्लॉटला आणि बियाणे मळयास त्यांनी भेट दिली. कार्यक्रमाच्या वेळी

बोलताना त्यांनी संस्थेसाठी विविध प्रकल्पातंर्गत आर्थिक सहाय्य करण्याबाबत उचित स्तरावर मागणी करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. दत्तात्रय थोरवे आणि आभार प्रदर्शन डॉ. सुभाष घोडके यांनी केले.

## कृषि विज्ञान केंद्रांसाठी नैसर्गिक शेतीवरील कार्यशाळा संपन्न

**दि. ३० ऑगस्ट, २०२२.** नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विषमुक्त अन्न निर्माण करणे शक्य होणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. ते पुढे म्हणाले हरितक्रांतीमुळे भारतीय कृषि उत्पादनात अमुलाग्र क्रांती झाली आहे. सद्यस्थितीत शेती क्षेत्रासमोर सुरक्षित अन्न निर्मिती करण्याचे महत्वाचे लक्ष आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या वतीने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १७ कृषि विज्ञान केंद्रांची एक दिवसीय नैसर्गिक शेती ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्थेचे संचालक डॉ. लाखन सिंग, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, कृषि परिषदेचे संचालक विस्तार डॉ. विठ्ठल शिर्के ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी डॉ. लाखन सिंग म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत आयोजीत नैसर्गिक शेती कार्यशाळेमुळे कृषि विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये या विषयावर जनजागृती करणे शक्य होईल. संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी नैसर्गिक शेतीबरोबरच सेंद्रिय शेती, योगिक शेती, झिरो बजेट शेती या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण १७ कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विषय विशेषज्ञ, कार्यक्रम सहाय्यक उपस्थित होते. या एक दिवसीय कार्यशाळेमध्ये नैसर्गिक शेती या विषयावर अध्यक्ष, अक्षय कृषि परिवार, कच्छ, गुजरात श्री. मनोजभाई सोलंकी, मंडळ कृषि अधिकारी  श्री. उमेश भदाने, सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख डॉ. उल्हास सुर्वे, कोल्हापूर कृषि विज्ञान केंद्राचे डॉ. रविंद्र सिंग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठातील डॉ. नामदेव म्हसकर आणि नंदुरबार कृषि विज्ञान केंद्राचे डॉ. राजेंद्र दहातोंडे यांनी उपस्थितांना नैसर्गिक शेती या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. भगवान देशमुख यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. डॉ. गोकुळ वामन यांनी आभार मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात अन्न सुरक्षा आणि अधिकार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



**दि. ७ ऑगस्ट, २०२२.** नवी दिल्ली येथील भारतीय  कृषि अनुसंधान परिषदेचा राष्ट्रीय  कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक  कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नसुरक्षा आणि अधिकार या विषयावर तज्ञांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हायब्रीडमोडमधील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील हे होते. यावेळी व्यासपीठावर परभणी

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

येथील अन्न आणि औषधे प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त श्री. नारायण सरकाटे, ठाणे येथील अन्न आणि औषधे प्रशासनाचे उपायुक्त श्री. दिगंबर भोगावडे तसेच डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण आणि कास्ट प्रकल्पाचे सह समन्वयक डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते. यावेळी भारतीय डेअरी असोसिएशनचे नवनियुक्त उपाध्यक्ष श्री. अरुण पाटील हे ऑनलाईन उपस्थित होते.

सेंद्रिय अन्न ग्राहकांचा दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. नारायण सरकटे म्हणाले की शासनाने सन २००६ मध्ये अन्नसुरक्षा आणि मानक कायदा अमलात आणला आहे तसेच सेंद्रिय अन्न नियमन २०१७ हा कायदा सन २०१८ पासून अमलात आलेला आहे. सेंद्रिय मालाच्या विपणनासाठी सेंद्रिय उत्पादनासाठी राष्ट्रीय कार्यक्रम आणि सहभागी हमी प्रणाली याचे प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. दिगंबर भोगावडे यांनी भारतातील खाद्यान्न हक्क चळवळ या विषयावर माहिती देताना भारतातील नागरिकांना अन्नप्रणाली विषयी योग्य माहितीची गरज असून त्यांनी सुरक्षित निरोगी आणि शाश्वत पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे सांगितले. इंजि. अरुण पाटील यांनी भारतातील आणि जगातील कुपोषण आणि अन्नाची कमतरता यांची प्रमुख कारणे तसेच अन्नासाठी संघर्ष हवामान बदलाचा परिणाम व विविध संकटासह भरमसाठ किमती यावर माहिती दिली. डॉ. दिलीप पवार यांनी सध्याच्या पिढीमध्ये आरोग्य विषयी विविध प्रयोग केले जात असल्याचे तसेच अन्नसुरक्षा व निरोगी आरोग्यासाठी योग्य आहार पद्धतीची गरज याविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत व व्याख्यात्यांची ओळख डॉ. मुकुंद शिंदे यांनी करून दिली. डॉ. उत्तम चव्हाण यांनी या व्याख्यानांविषयीची पार्श्वभूमी विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले तर आभार डॉ. उल्हास सुर्वे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. नीलिमा कोंडविलकर व इंजि. मोहसीन तांबोळी यांनी काम पाहिले.

## कृषि विद्यापीठाच्या बेकरी पदार्थ विक्री केंद्राचे उद्घाटन



**दि. १५ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागांतर्गत असलेल्या बेकरी पदार्थ विक्री केंद्राचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण, वनस्पती रोग शास्त्र व कृषि अनु जीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार, कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, वनस्पती शास्त्र विभाग

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रमुख डॉ. विजू आमोलिक, उद्यान विद्या विभागाचे प्राध्यापक डॉ. ढाकरे, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचारणे, जनसंपर्क अधिकारी डॉ. वामन गोकुळ, डॉ. भगवान देशमुख, डॉ. बाबासाहेब भिटे, डॉ. सचिन सदाफळ व विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे उपस्थित होते.

भारताच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त काल १५ ऑगस्ट च्या मुहूर्तावर अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाच्या बेकरी युनिटमध्ये संशोधनात्मक पद्धतीने निर्माण होणाऱ्या खाद्यपदार्थांचे लॉन्चिंग विद्यापीठाच्या प्रमुख प्रवेशद्वाराजवळ प्रायोगिक तत्त्वावर बेकरी पदार्थ विक्री केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या आयुर्वेदिक कुकीजमध्ये प्रामुख्याने फुले जांभूळ कुकीज, फुले त्रिफळा कुकीज, फुले तुलसी कुकीज, फुले कडीपत्ता कुकीज, फुले जिंजर (आले) कुकीज व फुले मशरूम कुकीज यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी या विभागाने विकसित केलेल्या आयुर्वेदिक कुकीजमध्ये फुले शतावरी कुकीज, फुले अश्वगंधा कुकीज, फुले पुदिना कुकीज, फुले बेहडा कुकीज आणि फुले आवळा कुकीज यांचे लॉन्चिंग केले होते. विद्यापीठाच्या या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाने पौष्टिक व आयुर्वेदिक खाद्यपदार्थांची निर्मिती अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेली आहे. विद्यापीठातील सर्व कर्मचारी वर्ग, विद्यार्थी तसेच इतर सर्वांनी चांगल्या आरोग्याच्या दृष्टीने या खाद्यपदार्थांचा वापर आपल्या आहारामध्ये फूड ॲज मेडिसिन म्हणून करावा व आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवावी असे आवाहन अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांनी यावेळी केले. डॉ. चव्हाण यावेळी त्यांच्या या विभागाविषयी अधिक माहिती देताना म्हणाले की आतापर्यंत या विभागातून २२९ विद्यार्थ्यांनी एम. एस. सी. व १२ विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी मिळविलेली आहे. या विभागामध्ये शेतीपूरक कृषि मालाची काढणी, हाताळणी, प्रतवारी, साठवण, प्रक्रिया व विक्री याविषयी संशोधन केले जाते. फळे व भाजीपाला प्रक्रिया व बेकरी तंत्रज्ञान या विषयातील एक महिना कालावधीचे प्रशिक्षण वर्ग राबवून त्याद्वारे ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना व महिला बचत गटांना लघुउद्योग उभारण्यास आवश्यक असणारे तांत्रिक मार्गदर्शन देऊन मदत केली जाते. आज अखेर फळे व भाजीपाला प्रक्रिया यामध्ये ३६ व बेकरी व्यवसाय तंत्रज्ञानामध्ये २४ असे एक महिना कालावधीचे प्रशिक्षण वर्ग राबविलेले असून त्यामध्ये अनुक्रमे ६६१ व ३१५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविलेला आहे. त्यापैकी ३० प्रशिक्षणार्थ्यांनी स्वतःचा फळे व भाजीपाला प्रक्रिया व्यवसाय सुरू केलेला आहे तसेच पंधरा प्रशिक्षणार्थींनी स्वतःचा बेकरी व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

## बाबुर्डी घुमट येथे शेती अवजारे व जैविक खतांचे वाटप



**दि. २३ ऑगस्ट, २०२२.** शेतीमध्ये पिकांच्या उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा कमीत कमी वापर करावा. रासायनिक खतांच्या अती वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडून त्याचा परिणाम पिकाच्या उत्पादनावर होत आहे. यासाठी

जैविक खतांचा योग्य प्रमाणात वापर केल्यास जमिनीची उत्पादकता वाढण्यास मदत होते असे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील आयओटी सद्यक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली प्रकल्पांतर्गत मनुष्यचलीत शेती औजारे व जैविक खते वाटप कार्यक्रम बाबुर्डी घुमट, अहमदनगर येथे आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक आणि कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार तसेच स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, सेवा फाउंडेशनचे डॉ. उमेश लगड व बाबुर्डी घुमट येथील सरपंच श्री. शेखर पंचमुख हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. लगड यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. गोरंटीवार यांनी अनुसुचीत जाती उपयोजनेतंर्गत जैविक खते व मनुष्यचलीत औजारांविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. रसाळ यांच्या हस्ते शेतकऱ्यांना औजारे व जैविक खतांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून इंजि. तेजश्री नवले, श्री. गोरक्ष शिरसाठ व श्री. अमोल गायकवाड यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कृषि विज्ञान केंद्र, नारायणगाव व फिनोलेक्स कंपनीला भेट




**दि. ९ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हाळगावच्या सर्व विद्यार्थ्यांना आजादी का अमृतमहोत्सव अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, नारायणगाव व फिनोलेक्स पाईप्स इंडस्ट्रीज, पुणे येथे भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना कृषि विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांना कोणकोणत्या प्रकारची माहिती देण्यात येते, शेतकऱ्यांच्या दृष्टीने कृषि विज्ञान केंद्राचे महत्त्व, कृषि विज्ञान केंद्रामार्फत राबवण्यात येणारी विविध प्रकल्प या विषयांची माहिती कृषि विज्ञान केंद्राचे मृदा विशेषज्ञ योगेश यादव यांनी दिली. फिनोलेक्स पाईप्स इंडस्ट्रीज, पुणे यांचेमार्फत विद्यार्थ्यांना या कंपनीमध्ये कोण कोणत्या प्रकारचे पाईप तयार होतात, शेतीच्या दृष्टीने कोणकोणते पाईप उपयोगी आहेत, पाईपचा दर्जा याविषयीची माहिती तज्ञांनी दिली. यानंतर कंपनीमध्ये विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कंपनीच्या मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने काही विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात येणारे सर्व उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांना कृषि विज्ञान केंद्राची व फिनोलेक्स कंपनीची भेट मिळण्यासाठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी मार्गदर्शन केले. या भेटीचे नियोजन महाविद्यालयाची विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. चारुदत्त चौधरी,

डॉ. सखेचंद अनारसे, डॉ. मनोज गुड, डॉ. प्रेरणा भोसले, प्रा. कीर्ती भांगरे, श्री. महेश सुरवसे, श्री. विशाल भोसले, श्री. अमृता सोनवणे, सौ. अंजली देशपांडे व सौ. वैशाली पोंदे यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात हर घर तिरंगा रॅली संपन्न




**दि. ८ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्याद्वारे हर घर तिरंगा जागृती रॅली विद्यापीठ परिसरात काढण्यात आली होती. या रॅलीला सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांनी मार्गदर्शन केले. रॅलीची सुरुवात डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या पुतळ्यापासुन झाली. पुढे कुलगुरु निवासस्थानासमोरुन अधिकारी, कर्मचारी वसाहतीमधून फिरुन परत महाविद्यालयात आली. रॅलीमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांचा सहभाग होता. रॅलीचे नियोजन डॉ. कैलास कांबळे आणि डॉ. सुनिल फुलसावंगे यांनी केले.

## धुळे कृषि महाविद्यालयाकडून घरोघरी तिरंगा प्रचारफेरीचे आयोजन



**दि. ११ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे कृषि महाविद्यालयाकडून भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त रामचंद्र नगर परिसरामध्ये घरोघरी तिरंगा प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले. सदर

प्रचारफेरीचे आयोजन कृषि महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, बाजरी संशोधन योजना, कृषि विज्ञान केंद्र व कृषि तंत्र विद्यालय, धुळे यांनी एकत्रितपणे केले होते. या प्रचार फेरीची सुरुवात शेतकरी पुतळ्यापासून झाली. या प्रचारफेरीमध्ये प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी उस्फुर्त सहभाग घेतला. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त घोषणा देवून जनजागृती करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजन धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. एस.पी. सोनवणे, डॉ.पी.डी. सोनवणे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. जी. बी. काबरे, डॉ. संदीप पाटील, डॉ. व्ही. एस. गिरासे, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. व्ही. व्ही. भावसार, डॉ. खुशाल बराटे, डॉ. आर.जे. देसले, डॉ. दिनेश नांद्रे, प्रा. एस.बी. देसले, डॉ. एस.पी. निकम, श्री. वाय. बी. तायडे व सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन डॉ. संदीप पाटील यांनी केले.

## जबलपूर येथील प्रशिक्षणात शास्त्रज्ञ, विद्यार्थी व शेतकऱ्यांचा सहभाग



**दि. २ ते ५ ऑगस्ट, २०२२.** पीक उत्पादनाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सौर उर्जा सिंचन प्रणाली प्रभावी आणि सर्वात योग्य पर्याय आहे. या सौर उर्जा सिंचन प्रणालीचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारु शकते. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी व प्राध्यापक वर्गांना विविध सौर उर्जेचे प्रकल्प विद्यापीठात आणण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील जागतिक बँक अर्थसहाय्यित, हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पाअंतर्गत प्राध्यापक, विद्यार्थी व शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा सिंचन प्रणाली या विषयावर दुसऱ्या तुकडीचा तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम जबलपूर– मध्यप्रदेश येथे बोरलॉग इनस्टिट्यूट ऑफ साउथ एशिया (बीसा) येथे संपन्न झाले. या तुकडीला निरोप देतांना डॉ. शरद गडाख बोलत होते.

या तीन दिवसांच्या प्रशिक्षणात बोरलॉग इन्टिट्युटचे प्रमुख पंकज सिंह व त्यांचे नवी दिल्ली येथील सहकारी परेश शिरसाठ आणि क्षितिज पांडे यांनी प्रशिक्षण दिले. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ पी. जी. पाटील यांच्या सुचनेनुसार व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक आणि कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील प्राध्यापक विद्यार्थी व शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले

होते. या प्रसंगी डॉ. गोरंटीवार यांनी प्रशिक्षणाची सविस्तर माहिती दिली. यावेळी डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सचिन नांदगुडे यांनी केले. सदरील तुकडीचे नेतृत्व डॉ सचिन सदाफळ व डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील खरिप हंगामातील बिजोत्पादन कार्यक्रम



**दि. ५ ऑगस्ट, २०२२.** उत्तम प्रतिचे शुध्द आणि दर्जेदार बियाणे उत्पादीत करण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. कुलगुरु डॉ. पी.जी.पाटील व संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विद्यापीठामार्फत बिजोत्पादन कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत दहा जिल्हयातील विविध संशोधन केंद्रे व मध्यवर्ती परिसर येथे चालु खरीप हंगामात ५७२ हेक्टर क्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये बाजरी (४ वाण), भात (४ वाण), नाचणी (२ वाण), मका (४ वाण), तुर (२ वाण), मुग (१ वाण), उडीद (१ वाण), तीळ (२ वाण), कारळा (२ वाण), सोयाबीन (६ वाण), भुईमुग (६ वाण), सुर्यफुल (१ वाण), कापुस (१२ वाण), चारा पिके (३ वाण), वरी (१ वाण), कुलथी (१ वाण), चवळी (३ वाण), मटकी (१ वाण), ध्यैंचा (१ वाण) व ताग (१ वाण) तसेच नेपिअर गवत (२ वाण), मारवेल गवत (२ वाण) व बर्टी (१ वाण) अशा एकुण २३ पिकांच्या ६३ वाणांच्या बिजोत्पादन कार्यक्रमा पासुन ८१०० क्विंटल बियाणे अपेक्षित उत्पादनाचे नियोजन केलेले आहे.

चालू खरीप हंगामात ५७२ हेक्टर क्षेत्रावर ८१०० क्विंटल बिजोत्पादनाचे लक्षांक विद्यापीठाने ठरविले आहे, प्रत्यक्षात ५७९ हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला असून प्रामुख्याने सोयाबीन पिकाच्या विविध वाणांचा ४८९ हेक्टर क्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे. खरीप २०२२-२३ या वर्षासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सोयाबीन पिकाचे १७४५ क्विंटल मूलभूत बियाणे उत्पादनाचे लक्षांक प्राप्त झाले आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संशोधन योजना/कृषि तंत्र विद्यालय/कृषि महाविद्यालय व मध्यवर्ती प्रक्षेत्रावर ४८९ हेक्टर क्षेत्रावर ६९०० क्विंटल मूलभूत बियाणे बिजोत्पादनाचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले आहे. तसेच विद्यापीठाने वेगवेगळया शेतकरी उत्पादक गट/संस्था व खाजगी बिजोत्पादक कंपन्या यांच्याबरोबर सोयाबीन पिकाच्या विविध वाणांचे २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीत ८६९ सामंजस्य करार केलेले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने विकसीत केलेल्या वेगवेगळया नवीन वाणांचा मोठया प्रमाणात प्रसार होण्यास चालना मिळणार आहे अशी माहिती विद्यापीठाच्या बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आनंद सोळंके यांनी दिली.

## मांजरसुंबा येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन



**दि. ४ ऑगस्ट, २०२२.** रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडले आहे. याचा परिणाम म्हणजे पिकांची उत्पादन क्षमता कमी होवून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. त्याकरीता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीत शेणखताचा वापर मोठ्या प्रमाणात करुन जमीन जास्तीत जास्त उत्पादनक्षम कशी होईल हे पाहिले पाहिजे व हे आरोग्य टिकविण्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांमधून केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगावच्या ग्रामीण कृषि जागरूकता व औद्योगिक प्रशिक्षण २०२२-२३ व आजादी का अमृत महोत्सवअंतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन मांजरसुंबा, ता. नगर या गावात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन डॉ. अहिरे बोलत होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अनिल दुरगुडे यांनी कांदा व सोयाबीन या पिकांमध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांचे महत्व, माती परिक्षण तसेच देशी गाय व संकरित गाय यांच्या शेण व मूत्र यामधील फरकाचे विवेचन केले. रावे समन्वयक डॉ. चारुदत्त चौधरी यांनी सोयाबीन व कांदा या पिकांवरील कीड व रोगांचे व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुक्कडवेढे येथील कृषिकन्या प्रज्ञा घुले हिने केले तर उपस्थितांचे आभार वांबोरी येथील कृषिकन्या वैष्णवी कासार हिने मानले.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय बौध्दिक संपदा अभियानाच्या अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन

**दि. २५ ऑगस्ट, २०२२.** कोल्हापूर येथील राजश्री छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय बौध्दिक संपदा अभियानांतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. गंगाधर पाटील होते. यावेळी मुंबई येथील राष्ट्रीय बौध्दिक संपदा कार्यालयाचे पेटंट परिक्षक श्री. अतुल खाडे यांनी विद्यार्थी, संशोधकांना बौध्दिक संपदा आणि अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. अतुल खाडे यावेळी मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यार्थी तसेच संशोधकांनी जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण प्रयोग नोंदविण्याचे प्रयत्न करावेत. डॉ. गंगाधर पाटील यांनी यावेळी महाविद्यालयाने यापूर्वीही नाविन्यपूर्ण संशोधन करुन पेटंट प्राप्त केले असल्याचे



सांगितले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर पतंगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. नंदना यांनी तर डॉ. चंदाराणी मेमाने यांनी आभार मानले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा




**दि. २३ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने एड्स जनजागृतीवर व्याख्यान आयोजित करण्यात आले. एसीपीएम मेडिकल कॉलेज धुळेच्या डॉ. नीता इंगळे यांना व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आलं होतं. आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे महत्त्व, आजचा युवक स्वामी विवेकानंदांच्या नजरेतून कसा असावा याविषयी मार्गदर्शन करून एड्स रोगाविषयी समज गैरसमज, कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सविस्तर मार्गदर्शन केलं. हा कार्यक्रम सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. डॉ. चिंतामणी देवकर यांनी प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर असा मंत्र देखील यावेळी दिला. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील पाटील डॉ. विपुल वसावे, डॉ. संदीप पाटील, डॉ.संदीप निकम व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**दि. १२ ऑगस्ट, २०२२.** आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या अंगी वकृत्व कला असणे फार गरजेचे आहे. वाचणाची



आवड असेल तर वकृत्वाची कला सहज साध्य होते. यासाठी विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करायला हवे असे प्रतिपादन हाळगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. अहिरे बोलत होते. यावेळी भारताची वाढती लोकसंख्या, भारताच्या विकासातील सहकार चळवळीचे महत्त्व व भारतीय स्त्रियांचा प्रेरणादायक प्रवास या विषयावर विद्यार्थ्यांनी व्याख्याने दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास पोखरकर, अजिंक्य साबळे, स्वप्निल धुमाळ, सुशांत बिराजदार, अक्षय पवार आश्लेषा डमरे यांनी स्पर्धेत भाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. प्रेरणा भोसले यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेरू पिकाच्या शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या बैठकीत शास्त्रज्ञांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**दि. २९ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील आखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाच्या पेरू पिकावरील शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची बैठक राहाता तालुक्यातील एकरुखे येथे संपन्न झाली. प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सतीश जाधव यांनी बैठकीच्या सुरुवातीला प्रास्ताविक करताना पेरू पिकासाठी शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची स्थापना करण्याचा उद्देश व त्याच्या उपयोगाविषयी स्पष्टीकरण केले. कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वरचे शास्त्रज्ञ डॉ. पुरुषोत्तम हेंद्रे यांनी पेरू लागवडीविषयी माहिती देतांना सध्या पेरू पिकावर स्केल किडीचा प्रादुर्भाव वाढत आहे तसेच

फळमाशी, मिलीबग, सुत्रकृमी व देवी रोगाची समस्या शेतकऱ्यांना भेडसावत असल्याचे सांगितले. डॉ. विकास भालेराव आणि डॉ. रणजीत कडू यांनी या किडरोग समस्यांवर मार्गदर्शन करताना एकात्मिक किड व रोग व्यवस्थापनावर माहीती देवून त्यामध्ये मशागती, भौतिक, जैविक व गरज पडल्यास रासायनिक पध्दतीचा वापर तसेच मित्र किडींचे व परागीभवन करणाऱ्या मधमाशीचे संवर्धन करण्याविषयी सविस्तर माहिती दिली. या बैठकीसाठी ताकुका कृषि आधिकारी श्री. शिंदे तसेच एकरुखे व राहाता तालुक्यातील पेरू उत्पादक शेतकरी उपस्थित होते. डॉ. कडू यांनी आभार मानले. ही बैठक यशस्वी होण्यासाठी शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. संदीप टिळेकर यांनी सहकार्य केले.

## लिंबू पिकाचे व्यवस्थापन विषयावरील शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची बैठक संपन्न



**दि. १७ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या आखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाच्या वतीने लिंबू पिकाचे व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन करण्यासाठी मु. पो. आनंदवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे शेतकरी प्रक्षिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री. सुदामराव नलावडे होते. या कार्यक्रमामध्ये उदयान विद्यावेत्ता डॉ. प्रमोद पाचनकर यांनी लिंबू पिकाचे लागवड तंत्रज्ञान या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. रणजीत कडू यांनी किड व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले तसेच जैविक किड नियंत्रण व रासायनिक किटकनाशकाचा योग्य वापर या विषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. प्रा. मधुकर शेटे यांनी लिंबू पिकामध्ये येणाऱ्या रोगाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी परिसरातील लिंबू उत्पादक शेतकरी आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी लिंबू उत्पादक संघाचे अध्यक्ष श्री. गोरख आळेकर यांनी लिंबू पिकाच्या बाजारभावाविषयी मार्गदर्शन केले. कृषि विभागाचे कृषि सहाय्यक श्री. उगले यांनी अनुदानासबंधी माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रगतशील शेतकरी श्री. आदिक वागणे यांनी केले.

## कसबे डिग्रज येथील विद्यार्थ्यांना बिजप्रक्रिया तसेच बेणे निवडीबाबत मार्गदर्शन

**दि. ३ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कसबे डिग्रज, जि. सांगली येथील कृषि तंत्र विद्यालयामधील विद्यार्थ्यांना सोयाबीन बीजप्रक्रिया तसेच हळद, आले कंद प्रक्रिया आणि बेणे निवड याविषयी डॉ. मनोज माळी यांनी मार्गदर्शन केले. कनिष्ठ संशोधन सहाय्यक डा. प्रदिप पाटील यांनी पेरणीपूर्वी बिजप्रक्रियेचे महत्व, पिकनिहाय रासायनिक जैविक बीजप्रक्रिया, बियाणे हाताळणी या विषयी सविस्तर माहिती दिली. कृषि सहाय्यक शर्मिला वाटकर यांनी

जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्माचा वापर व त्याचे फायदे विषद केले. यावेळी विद्यार्थ्यांना हळद, आले या कंदवर्गीय पिकांचे बियाणे प्रकार जसे मातृकंद, अंगठाकंद, हळकुंडे व सोराकंद यांची ओळख करुन देण्यात आली. लागवडीसाठी निरोगी बेणे निवड, त्याचे वजन, विविध जातींचे बियाणे कसे ओळखावे तसेच लागवडीपूर्वी रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया



करण्याचे फायदे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे दाखविण्यात आले. प्रात्यक्षिक समन्वयक श्री. दिगंबर आकिवटे यांनी विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. या प्रात्यक्षिकांसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे सामुहिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रम संपन्न



**दि. १७ ऑगस्ट, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वराज्य सप्ताह अंतर्गत सामुहिक राष्ट्रगीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे आयोजन धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सदर कार्यक्रमावेळी डॉ. संदीप पाटील यांनी उपस्थितांना कार्यक्रमाचे महत्त्व सांगून सामुहिक राष्ट्रगीत गायन करून घेतले तसेच भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त घोषणा देवून जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. एस.पी. सोनवणे, डॉ.पी.डी. सोनवणे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. जी. बी. काबरे, डॉ. संदीप पाटील, डॉ. व्ही. एस. गिरासे, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. व्ही. व्ही. भावसार, डॉ. खुशाल बराटे, डॉ. दिनेश

नांद्रे, प्रा. एस. बी. देसले, डॉ. सुनिल पाटील आणि प्रा. विपुल वसावे, लेफ्टनंट पी. बी. देवरे, प्रा. के. बी. पाटील, डॉ. एस.पी. निकम, श्री. वाय. बी. तायडे व सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पुणे जिल्ह्यातील बेलसर येथे कृषि प्रदर्शन व मेळाव्याचे आयोजन



**दि. १५ ऑगस्ट, २०२२.** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती पुरंदर (कृषि विभाग) व अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र जाधववाडी यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील बेलसर येथे भव्य कृषि प्रदर्शन व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संशोधन केंद्रप्रमुख डॉ. प्रदीप दळवे यांचे हस्ते कृषि प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. उदघाटनानंतर शेतकरी मेळाव्यात अखिल भारतीय समन्वित अंजीर आणि सिताफळ संशोधन केंद्र जाधववाडी येथील डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन, डॉ. युवराज बालगुडे यांनी सिताफळातील एकात्मिक रोग व्यवस्थापन तर श्री नितीश घोडके यांनी एकात्मिक कीड नियंत्रण या विषयावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास भागातील सिताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## पुणे जिल्ह्यातील मौजे झेंडेवाडी येथे सिताफळ शेतीशाळा



**दि. १० ऑगस्ट, २०२२.** अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी आणि तालुका कृषि

अधिकारी, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील मौजे झेंडेवाडी येथे स्मार्ट प्रकल्पाच्या अंतर्गत स्थापन झालेल्या पुरंदर लक्ष्मी शेतकरी उत्पादक कंपनीच्या सभासद आणि इतर शेतकऱ्यांसाठी सिताफळ शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. सुनील नाळे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन तर सिताफळ रोग कीड नियंत्रण याविषयावर श्री. नितीश घोडके यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी परीसरातील सिताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सप्टेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली. किंवा बुप्रोफेझीन २५ मिली. किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळ्यामध्ये सतत २–३ दिवस, ८–१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किवा लम्वडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरीक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटीराम ५.५% + पायरॅब्लोरोस्टोवीन ५% डब्ल्यु.जी. २० ग्रॅम प्रति १० ली. पाण्यात फवारणी करावी.
- मॅग्नेशिअम सुक्ष्म अन्नद्रव्ये २०ते ३० कि.ग्रॅम प्रति हेक्टरी जमिनीत द्यावे. लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.
- गुलाबी बोंड अळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- कपाशीच्या शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षीथांबे उभे करावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळ्या टिपून खातील.

### ऊस

- सहा ते आठ आठवडे वयाच्या आडसाली लागणीस को.८६०३२ जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र,स्फुरद,पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खाताची दुसरी मात्रा देण्यासाठी ४३४ किलो युरिया (२०० किलो नत्र) तर इतर जातीसाठी शिफारशीत (४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद, पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खाताची दुसरी मात्रा देण्यासाठी ३४७ किलो युरिया (१६० किलो नत्र) प्रती हेक्टरी वापरावी. तसेच सदरची खतमात्रा देताना ६ किलो युरियासाठी १ किलो या प्रमाणात निंबोळी पेंडीची भुकटी चोळून द्यावी.
- आडसाली उसाची लागण केलेल्या क्षेत्रात उगवण विरळ झालेल्या ठिकाणी रोप लागण पध्दतीने वेळीच नांग्या भरुन घ्याव्यात.

- पूर्वहंगामी ऊस लागणी करीता पूर्व मशागतीची कामे पूर्ण करा. मशागत केलेल्या क्षेत्रात हेक्टरी २५ टन शेणखत किंवा कंपोष्ट खत वापरावे. यापैकी अर्धे शेणखत(१२.५ टन) दुसऱ्या नांगरटीपूर्वी व अर्धे शेणखत(१२.५ टन) लागणीपूर्वी सरी सोडण्यापूर्वी द्यावे.
- पांढरी माशीचा प्रादुर्भाव वाढल्यास कोषग्रस्त पाने कापून काढावीत व नंतर मेलॅथिऑन ५०% प्रवाही हे किटकनाशक २० मिली. १० लिटर पाण्यातून फवारावे.
- उसाच्या पानांवरील तांबेरा व पोक्का बोईंग या रोगांच्या नियंत्रणाकरिता ०.३ टक्के मँकोझेब किंवा ०.१ टक्के कार्बेन्डॅझीम या बुरशीनाशकाची १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसाच्या अंतराने स्टिकर वापरुन फवारणी करावी.
- आडसाली ऊस ६ ते ८ आठवडयाचा असताना व्दिदलवर्गीय तण नियंत्रणासाठी २,४–डी या तणनाशकाचा १.२५ किलोग्रॅ ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी जमिनीवर फवारणीसाठी वापर करावा. फवारणी करताना जमीन तुडवू नये. फवारणीनंतर तीन ते चार दिवस त्या क्षेत्रामध्ये कोणतीही मशागत करु नये.
- शेतातील पावसाचे साठलेले पाणी त्वरीत शेताबाहेर काढून पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढा.

### हरभरा व्यवस्थापन

- हरभरा पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवाच्या २–३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे.
- २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर पर्यंत जिरायती हरभरा बीजप्रकिया करुन पेरावा (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन/ किलो बियाणे किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम / १० किलो बियाणे ).
- शिफारशीत खत मात्रा पेरणीवेळी द्यावी.

### भात

- पाणी व्यवस्थापन भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी. फुलोरा व दाणे भरण्याच्या अवस्थेत १० सें.मी.
- पीक संरक्षण तपकिरी तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रिड २० एस.एल. (१२५ मिली) किंवा थायोमिथॅक्झाम २५ डब्लु.जी. (१०० ग्रॅम) किंवा इथोफेनफॉस १० ई.सी. (५०० मिली) किंवा ॲसिफेट ५० डब्ल्यु.पी.(९५० ग्रॅम) किंवा बुप्रोफेजीन २५ एस.सी. (१००० मिली) प्रती हेक्टरी फवारावे.

### कडधान्य पिके

### मूग आणि उडिद

- पिकाच्या पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.

### तूर

- पीक फुलोऱ्यात असताना किड व रोगांपासून संरक्षण करावे. यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

वर्ष :२, अंक क्रं. : २०, ऑगस्ट, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### नाचणी पीक

- पीक संरक्षण
- लष्करी अळी व पाने खाणारी अळी : खरीपात ३० ते ८० टक्के नुकसान. गवताळ–डोंगरी भागात जास्त प्रादुर्भाव, बंदोबस्त शेतातील/बांधावरील गवत काढून टाकावे. मिथील पॅरॉथिऑन भुकटी हेक्टरी २० ते २५ किलो धुरळावी.
- मावा – तुडतुडे : प्रादुर्भाव सुरुवातीच्या काळात जास्त रस शोषून घेतात. कर्बग्रहण मंदावते. बंदोबस्त – रोगर ३० टक्के प्रवाही १० मि.ली. किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- करपा रोग : प्रादुर्भाव दिसून येताच कार्बडेन्झीम (बावीस्टीन)ऽ०.१% क्रियाशील घटकाप्रमाणे पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- पावसाचा ताण पडल्यास संरक्षित पाणी देणे.

### बाजरी

- पिकाची काढणी व मळणी करावी. धान्य उन्हात चांगले वाळवून साठवून ठेवावेत.

### सोयाबीन

- पेरणीनंतर ७५ ते ८० दिवसानी : शेंगेवरील करपा नियंत्रण आणि बियाणाची प्रत सुधारणे याकरिता शिफारशीत बुरशीनाशकाची फवारणी करावी. पीक पक्वतेनंतर पिकाची काढणी व मळणी करावी. मळणी करताना मळणी मशीनच्या शाफ्टची गती ३०० ते ४०० आरपीएम असावी. म्हणजे सोयाबीनच्या उगवणक्षमतेवर अनिष्ट परिणाम होणार नाही.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवडा – शेतजमीन पेरणीसाठी तयार करावी
- सप्टेंबर दुसरा पंधरवडा – खालील शिफारशीनुसार ज्वारीची पेरणी करावी. नत्र दोन हप्त्यांत (पेरणीवेळी निम्मे व पेरणीनंतर एक महिन्याने निम्मे) संपूर्ण स्फूरद व पालाश पेरणी वेळेस द्यावे. कोरडवाहू जमिनीस संपूर्ण नत्र व स्फूरद पेरणीवेळेस द्यावे.
- बीजप्रक्रिया– पेरणीपूर्वी बियाण्यास गंधक ४ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम प्रति १ किलो व ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरिलियम किंवा पीएसबी १० किलो बियाण्यास २५० ग्रॅमप्रमाणे जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.
- बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर– पेरणीसाठी हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. दोन ओळीतील अंतर ४५ सें. मी. व दोन रोपातील अंतर १५ सें. मी. ठेवावे.
- खोडमाशी नियंत्रण : पेरणीनंतर ७–८ दिवसांनी क्युनॉलफॉस २५ ईसी प्रवाही ७५० मिली व ५०० लीटर पाणी प्रती हेक्टरी फवारणी करावी.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – पक्व फळांची काढणी करावी. फळांवरील रस शोषणाऱ्या पतंगाचे नियंत्रण करावे.
- सिताफळ – डोळे पडलेल्या फळांची काढणी करावी.
- बोर – भुरी व फळे पोखरणाऱ्या माशी वर नियंत्रण करावे.

- अंजीर – मध्यम ते हलकी छाटणी करावी.
- जांभूळ – बाग ताणावर सोडावी.
- कागदी लिंबू – शिफारशीत खतमात्रेच्या ३० टक्के नत्राची मात्रा द्यावी. हस्त बहाराचे नियोजनासाठी १००० पीपीएम सायकोसील (सीसीसी) ची फवारणी करावी.
- मोसंबी व कागदी लिंबू – रस शोषणारा पतंग : गंध सापळ्याचा वापर करावा (२०० मिली क्लोरोपायरीफॉस + १ किलो गुळ + १ लि. मोसंबीचा रस + १० लि. पाणी मिसळून त्यामधून प्रत्येकी ५०० मिली द्रावण घेऊन हेक्टरी १५–२० सापळे लावावे.) कँकर / खैऱ्या रोग : स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यातून फवारणी करावी.

## भाजीपाला व्यवस्थापन

- कांदा पिकामधील तण नियंत्रणासाठी लागवडीपासून २१ दिवसांनी रासायनिक तणनाशकाची फवारणी करावी. फवारणीवेळी शेतामध्ये वापसा स्थिती असावी याची काळजी घ्यावी.
- कांदा पीक एक महिन्याचे झाल्यावर नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- कांदा पिकावर येणारा करपा व फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.
- खरीप टोमॅटो, वांगी, मिरची, भेंडी, गवार व वेलवर्गीय भाजीपाला तसेच कोबी व फ्लॉवर पिकामध्ये खांदणी करून झाडांना भर लावावी.
- टोमॅटो पिकास ताटी पध्दतीने आधार द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाला पिकांना मंडप अथवा ताटी पध्दतीने आधार द्यावा.
- खरीप भाजीपाला पिकांना नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- खते देण्यापूर्वी पीक खुरपून स्वच्छ करावे.
- आवश्यकतेनुसार पीक संरक्षणाचे उपाय करावे.
- जास्त पाऊस किंवा सततच्या ढगाळ हवामानामुळे पिकांवर सुध्दा अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे दिसताच सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी.
- रसशोषून घेणाऱ्या किडींपासून विषाणू जन्य रोगांचा प्रसार होतो अशा किडींचे वेळीच नियंत्रण करावे.
- पीक संरक्षणाचे उपाय करतांना जैविक किटकनाशकांचा वापर करावा.
- शेवटच्या आठवड्यात रांगडा कांद्याची लागवड करावी.

## आले

- पुढील वर्षाच्या आले लागवडीसाठी योग्य बेण्याची निवड सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यातच पुर्ण करावी.
- या महिन्यात रोग विरहीत आले बेणे प्लॉटची पाहणी करावी व स्थानिक हवामानानुसार, जमिनीच्या मगदुरानुसार जाती निवडाव्यात.
- पाने गुंडाळणारी अळी पासून आले पिकाचे संरक्षण करावे. आले पिकावर ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयापासून ते नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवडयापर्यंत या किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडीची अळी हिरवट रंगाची असून ती अंडयातून बाहेर पडल्यानंतर स्वत:च्या शरीराभोवती पान गुंडाळून घेते व आत राहून पाने खाते. किडीच्या प्रादुर्भाव

दिसताच गुंडाळलेली पाने गोळा करुन नष्ट करावीत. तसेच ५% निंबोळी अर्क अथवा कार्बारील ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून त्याची फवारणी करावी.

## पशुसंवर्धन

- अस्वच्छतेमुळे स्तनदाह होवु नये यासाठी कासेची स्वच्छता ठेवावी.
- वादळी पावसाचे दिवस असल्याने जनावरांचे रक्षणासाठी नियोजन करावे. उच्च दाबाच्या विजेच्या तारा व वादळी विजेपासून रक्षणसाठी उपाय करावे.
- पावसामुळे गोठ्यातील वातावरणात आर्द्रता वाढते आणि जनावरे अस्वस्थ होतात. हे टाळण्याकरीता गोठयातील हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.

## अवजारे

### ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे तयार करण्याचे अवजार

- अवर्षनप्रवण विभागामध्ये खरीप पीक न घेतलेल्या मध्यम काळया जमिनीत पावसाचे पाणी मुरविण्यासाठी ६ मि. द २ मि. आकाराचे बंदिस्त वाफे तयार करण्यासाठी
- ३५ अश्वशक्ती ट्रॅक्टरद्वारे सहज चालविता येते.
- प्रक्षेत्रीय क्षमता ४.०० ते ४.५० हेक्टर प्रति दिवस.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४८३/२०२२